म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. नं. ८
३०

# [redacted]चीभेट

## जागृति

—: लेखक व प्रकाशक :—

[redacted] व अळेकर.

REFBK-0004345

[redacted] अकोला, वऱ्हाड.

[redacted] १८०३ नवंबर १९४९

[redacted] २० मार्च १९३१

[redacted] ६ आणा

[illegible]

# अवतार भूपाळी

जन ह्मणा हो श्री हरी, प्रातःकाळीं स्मरण करी ॥
जेणें तराल भवसागरीं, हा निर्धारीं भरंवसा ॥ ध्रु.॥
वेद नेले निशाचरीं मत्स्यरूप झाले हरी ॥
कार्य ब्रह्मयाचें करी, शंखासुर वधोनियां ॥ १ ॥
दैत्य मातले भूमंडळीं, पृथ्वी नेली रसातळीं ॥
कूर्मरूपी हो वनमाळी, पृष्ठीं धरिली मेदिनी
मही कळमळली पहाहो, देव झाले वराह हो ॥
मग वधिले दैत्य दानवो, पृथ्वी दाढे धरूनियां ।
पुत्र पित्यानें गांजिला, तो हा नरहरि स्मरता
स्तंभीं अवतार धरियेला, भक्त रक्षिला प्रल्हाद ॥
याग करितां झाला बळी, इंद्र कांपिला चळीं
वामन रूपें हो वनमाळी, घातिला पाताळीं बळि
रेणुके उदरीं भार्गव झाले, राजे समस्त संहारिले
राज्य ब्राह्मणां दिधलें, सुखी केले भूदेव ॥ ६
सूर्यवंशीं रघुनंदन, वानरांना मेळवून ॥
सागर पाषाणीं बांधुन, संहारिले राक्षसां ॥ ७
कारागृहीं अवतरले, श्रीकृष्ण गोकुळीं वाढले ॥
कंस चाणूर मर्दिले, राज्यीं स्थापिले उग्रसेना ॥ ८
बौद्ध अवतार धरिला, जन हा बहुत कष्टी झाला ॥
मग कलीस वर दिधला, आपण राहिले निद्रिस्थ ॥ ९ ॥
पुढें कल्की होणार, ऐसा शास्त्राचा निर्धार ॥
मग फिटेल भवफंद, या हो विश्वजनांचा ॥ १० ॥
दशावतार भूपाळी, नित्य स्मरतां प्रातःकाळीं ॥
दास ह्मणे हो भूमंडळीं, आनंद होईल ॥ ११ ॥

# शुद्धिपत्र

कांहीं प्रतींत बराबर न उमटलेले शब्द आणि अशुद्ध शब्द दुरुस्त करून घेण्याची कृपा करावी.

| पान | ओळ | शब्द | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ६ | १२ | २ | दाखविला | दाखविली |
| ६ | २४ | २ | परदशेगमनाला. | परदेशगमनाला |
| ७ | [illegible] | ४ | —— | अंतरने |
| ८ | १२ | ४ | यिचारी | विचारी |
| ८ | २० | ५ | अचा | अर्चा |
| ८ | २५ | ७ | श्रीसथांच्या | श्रीसमर्थांच्या |
| १३ | २४ | ५ | आईबाच्याहि | आईबापाच्या |
| १६ | २१ | २ | अंर्ती | अंतीं |
| १८ | १५ | १ | दिसली | दिस |
| १९ | ५ | ४ | कोलहि | कौलहि |
| १९ | १८ | ३ | पुरुपाना | पुरुषांनीं |
| २२ | २५ | ७ | झालल्या | झालेल्या |
| २४ | १ | ५ | वसर रंभी | वत्सरारंभीं |

# शुद्धिपत्र

कांहीं प्रतींत बराबर न उमटलेले शब्द आणि अशुद्ध शब्द दुरुस्त करून घेण्याची कृपा करावी.

| पान | ओळ | शब्द | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ६ | १२ | २ | दाखविला | दाखविलीं |
| ६ | २४ | २ | परदशेगमनाला. | परदेशगमनाल |
| ७ | [illegible] | ४ | —— | अंतरने |
| ८ | १२ | ४ | यिचारी | विचारी |
| ८ | २० | ५ | अचा | अर्चा |
| ८ | २५ | ७ | श्रीसर्थांच्या | श्रीसमर्थांच |
| १३ | २४ | ५ | आईबाच्याहि | आईबापाच्य |
| १६ | २१ | २ | अंर्ती | अंतीं |
| १८ | १५ | १ | दिसली | दिस. |
| १९ | ५ | ४ | कोलहि | कौलहि |
| १९ | १८ | ३ | पुरुपाना | पुरुषांनीं |
| २२ | २५ | ७ | झालल्या | झालेल्या |
| २४ | १ | ५ | वसर रंभी | वत्सरारंभीं |

REFBK-0004345



# पाडव्याची भेट

"जागृति"

८३४५

मध्यप्रांतांत नोकरी निमित्त असतांना बरेच दिवस जवळ जवळ पंधरा वर्षे एकाच ठिकाणीं राहण्याचा प्रसंग आला तो जबलपूर मुकामीं आला. तेव्हां तेथून जवळच असणाऱ्या नर्मदातटाकीं भेडाघाटावर जाण्याचे कित्येकदां प्रसंग आले. कारण तें ठिकाण फारच रमणीय असल्यामुळें बाहेरून येणाऱ्या मंडळींना तर तेथें जावेसेच वाटे. ह्मणून कधीं बाहेरून येणाऱ्या मित्र मंडळी बरोबर तर कधीं स्वतःच होऊन एकटे त्या ठिकाणीं जाण्याचे प्रसंग येतच असत. असें होतां होतां बारा वर्षे लोटलीं. पण काय असेल ते असो १९१८ सालीं कै. माधवरावजी सप्रे यांच्या सारख्या संताबरोबर त्या ठिकाणीं जाण्याचा प्रसंग आला तो

फारच अपूर्व होता. कारण त्या प्रसंगीं त्यांच्या बरोबर नौका-विहार करीत असतां पूर्वी कधींही न सुचलेले असे विचार मनांत आले इतकेच नव्हे तर ते मनांत आलेले विचार लेखाच्या द्वारें ही प्रसिद्ध करण्याची स्फूर्ती झाली. तेव्हां कै. माधवरावजींनींहि प्रोत्साहनच दिले. ह्मणूनच कीं काय श्री नर्मदा माईच्या कृपेनें विचारास वळण लागून तेव्हां पासून जी लेखमाला सुरूं झाली ती पुढें आतां पर्यंत कोणत्याही प्रकारच्या अडचणी न येतां अव्याहत चालू राहिली आणि नंहि त्याच वर्षी प्रथम तीन लेख प्रसिद्ध केल्या नंतर पुढें गेल्या बारा वर्षांत दरवर्षी प्रसिद्ध होत असणारे लेख पाडव्याची भेट ह्मणून वत्सरारंभाच्या सुमुहूर्तावर ध्वजारोपण प्रसंगी ईश्वरार्ची प्रार्थना करून सूज्ञ मंडळीपुढे सादर करतां आले. आणि सुज्ञ मंडळींनींहि प्रत्येक प्रसंगी प्रोत्साहनच दिले. ह्मणूनच की काय गतवर्षीचा पधरावा लेख सुज्ञ मंडळीपुढें सादर करण्याचा योग धुळें मुक्कामी आला तेव्हां तर मनाला फारच आनंद झाला. कारण नोकरी निमित्त जरी मला मध्यप्रांतांत राहण्याचा प्रसंग आला होता तरी धुळें येथेंच माझ्या पित्याचे आणि मातेचे बालपण गेलेलें असून दोन्ही कडील अजोळ बरेच दिवस तेथें घर करून नांदलेले असल्यामुळें आणि माझे ही बालपण थोडे दिवस तेथें गेलेलं असल्यामुळें धुळें हे माझे मुळचें ठिकाण हे एक आणि दुसरें असें कीं मूळ ठिकाणची जाणीव झाली की आईबापाचा आईबाप मुळ पुरूष जो ईश्वर त्याचीही जाणीव होणे साहाजिकच असते ह्मणूनच की काय ईश्वराचेंही अस्तित्व असें कांहीं जनतेतही दिसू लागलें कीं त्या जनताजनार्दनावरच लेख लिहिण्याचा

योग आला. आणि तो विषयहि आतां पर्यंत प्रसिद्ध झालेल्या लेखांच्या मानाने सुद्धां ओघानेंच आला आणि तो लेखही अशा ठिकाणी असतांना प्रसिद्ध करण्याचा योग आला कीं त्या ठिकाणीं ह्मणजे खोल गल्लींतील पुरंदरे यांच्या श्रीराम मंदिरांत होणाऱ्या रामनवमीच्या उत्सवालाही त्याच दिवशीं सुरुवात झालेली असल्यामुळें वत्सरारंभीं त्या ठिकाणीं ध्वजारोपण करून सामुली वहिवाटी प्रमाणें ईश्वराची प्रार्थना करीत असतांना विश्वमंदिरांत असणाऱ्या ईश्वराच्या सूर्यरूपीं तजानें प्रकाशणाऱ्या सूर्यनारायणाला नमन करून मंदिरांत पूर्वाभिमुख असणाऱ्या श्रीरामचंद्राच्या मूर्तीला नमन करण्याचा सुयोग आला आणि तेथील सूज्ञ मंडळींनींहि माझ्या त्या लेखाचा स्वीकार करून श्रीराम मंदिरांत येण्याची कृपा केली. तेव्हांतर कित्येक पूर्वींचे नवमताभिमानी सुद्धां पुढें पुराणमताभिमानी झालेले पाहून जनताजनार्दनांत कशा प्रकारे वाढ होते हें लेखात प्रतिपादन केल्या प्रमाणेंच पाहिलेच दिवशीं अनुभवास आलें. अशा प्रकारे तो पहिलाच दिवस आनंदाचा गेला असें नाहीं तर मंदिरांत होणारा राम नवमिचा उत्सव संपेपर्यंत सगळेच दिवस आनंदाचे जाऊन पुढें सबंध वर्षांत इतकें कांहिं आनंदाचे प्रसंग घडून येत असल्याचें दृष्टोत्पत्तीस पडले आणि निरनिराळ्या ठिकाणी घडून येत असल्याचे वर्तमानपत्रद्वारेंहिं समजले कीं कोण-त्याना कोणत्यातरी प्रकारें जनतेंत जागृति उत्पन्न होऊन त्या योगें जनताजनार्दनांतहिं सर्व बाजूनें एक सारखी वाढच होत आहे आणि धर्म कर्म संयोगानें अतीं यश प्राप्त व्हावे ह्मणूनच कीं काय धार्मिक बाबतींत तर जनतेचे असें कांहीं

लक्ष प्रथम लागलेलें दिसले कीं कित्येक नवमताभिमानी आपण होऊनच पुराणमताभिमानी होत असतांना दिसले तेव्हांच पुढें त्यांचे लक्ष व्यवहाराच्या दृष्टीनें असणाऱ्या राजकारणांतहि जात असल्याचें दिसून आलें. आणि अशा प्रकारे सनातन धर्मातील तत्वेंच शेवटीं पटत असतांना दिसलीं. इतकेच नव्हे तर नव्याचे नऊ दिवस ह्मणून नवीन मताला भुरळून जाऊन कांहींनीं नवीन मताचा पुरस्कार करीत असतांना आपणास नवमताभिमानी ह्मणवून घेऊन सनातन धर्मीयावर कितीही तोंडी आणि लेखी अपशब्दांचा भडीमार केला आणि तशा लेखांना प्रोत्साहन देणाऱ्या वर्तमानपत्रांचा आणि मासिकांचा पुष्कळ खप झाला तरी तशा लेखांतील विचार नाटक आणि कादंबरीतील विचारा प्रमाणें मनोराज्या सारखे करमणूक करणारे वाटून शेवटीं पहावे तर सनातन धर्मातील तत्वेंच कायम राहत असतांना दिसलीं. जणुं काय सनातन धर्मातील तत्वें इतक्या कांहीं उत्तम रीतीनें निरनिराळ्या धार्मिक ग्रंथांतून पूर्वी पासून प्रतिपादन होत गेलेलीं आहेत कीं त्या तत्वांना सनातनत्वच आलेलें आहे. आणि तेही अशा प्रकारचे "यावच्चंद्र दिवाकरौ" राहणारे सनातनत्व आलेले आहे कीं त्यांचें तेज आतां कमी होणें शक्यच नाहीं! आणि यदाकदाचित् त्यांना काळीमा लावणारे असें कांहीं नाटकी प्रकार मधून मधून घडूनच आले तर ते ग्रहणासारखे थोडा वेळ राहून पुढें त्यांचें पूर्वी पासून असलेलें तेज शेवटीं चमकणारेंच आहे! मग सनातन धर्मातील तत्वें प्रतिपादन करण्याकरीतां आतां

वर्तमानपत्रांचीच जरुरी आहे असें ह्मणून तशा प्रकारचीं पत्रें नसलीं तर तीं तत्वें नाहीशीच होतील असें कोण ह्मणणार! उलट नास्तिकपणा पर्यंत तमोगुणाची मजल पोहचविणाऱ्या नवमताभिमान्यांनीं कितीही दणदणीत लेख लिहिले तरी पंढरपूरच्या आणि इतर क्षेत्रांच्या ठिकाणची यात्रा भरावयाची ती भरतेच. आणि नासिक सारख्या ठिकाणीं तर हवा पालट करण्याकरितां ह्मणून येणारे नवमताभिमानी सुद्धां गोदातटाकीं स्नान करीत असतांना असे कांहीं आचार, विचार आणि परम्परा पाळतांनाहि दिसतात कीं ते पुराणमताभिमानीच आहेत! जणूं काय धर्मासंबधानें अनास्थाच राहावी अशा प्रकारचे शिक्षण मिळाल्यामुळें तर्कशास्त्राच्या जोरावर पुराणमताभिमान्यानीं वादांत घाबरून जावे असे प्रसंग येतांना दिसले तरी तशा प्रकारचा नास्तिक वाद करणाऱ्यांची गति वर वर असल्यामुळें मुळाशीं असलेलीं तत्वें शोधण्याकरिता तर त्यांना पुराणमताभिमानीच व्हावें लागलें! ह्मणूनच कीं काय श्री छत्रपति शिवाजीमहाराजाचे निरनिराळ्या प्रकारचे उत्सव करीत असतांना मी मी ह्मणणाऱ्या नास्तिकाचेंहि लक्ष असे कांहीं रामायण महाभारतादि ग्रंथाकडे गेलेले दिसलें कीं तशा प्रकारचे धार्मिक ग्रंथच जास्त स्फूर्तिदायक आहेत! इतकेच नव्हें तर श्रीमत्भगवत्गीतेंतील असणाऱ्या तत्वांकडे नव मताभिमान्यांचेंच नव्हें तर परकीयांचेंहि असें कांहीं लक्ष जात असल्याचे दिसून येतें कीं त्या योगें सनातन धर्मांतील तत्वांनाच उज्ज्वल स्वरूप प्राप्त होत असतांना

दिसलें. मग तीं तत्वें धार्मिक बाबतींतलीं असोत अथवा व्यवहारिक बाबतींतलीं असोत! असो. सरकार दरबारीं तर बहुमताचा फायदा घेऊन नवमताभिमान्यांनीं आपल्या नवीन मताप्रमाणें कायदे मंजूर करवून घेतले तरी त्या योगेंहि सनातन तत्वांनाच शेवटीं महत्व येत असतांना दिसलें. कारण पुनर्विवाह करणें कायदेशीर ठरून पुनर्विवाह करणाऱ्यांचें वर्तमानपत्रद्वारें निरनिराळें कौतूक केलें गेलेलें असलें तरी तशा प्रकारच्या आमि- षाला भुरळून न जातां ज्या जातींत पुनर्विवाहाची चाल रूढ आहे त्या जातींतल्या साध्वी स्त्रियांनीं सुद्धां पर- घर न निवडतां आपल्या पतीच्या पश्चात् आपलीं घरें चालवून दाखविलीं आणि कांहींनीं तर निरनिराळ्या प्रकारची देशसेवा केली. तेव्हां तर पुनर्विवाह करणें कनिष्ठ ठरून आणि ज्या जातींत पुनर्विवाहाची चाल रूढ आहे त्या जाति मागसलेल्या म्हणून म्हणविल्या गेलेल्या पाहून तीं सुधारणाच नव्हे असेंही कित्येक न- वमताभिमान्याना सुद्धां शेवटीं वाटत असल्याचेंच दिसून आलें. तसेंच परदेशगमनाची बंदी काढून टाकण्यांत सुख मानणाऱ्या नवमताभिमान्यांनीं जेव्हां परदेशांत जाणारी कांहीं मंडळी स्वदेश सोडून परदेशांतच राहतांनां पाहिलें आणि राजेरजवाडे व श्रीमंत मंडळी चैनीखातर परदेशांत जाऊन लाखो रूपये खर्च करीत असतांना पाहिलें तेव्हां तर त्यांनाहि असेच शेवटीं वाटत असतांना दिसलें कीं परदेशगमनाला पूर्वीं बंदी होती तीच बरी होती. आणि देशाच्या फायदा करण्याच्या हेतूनें परदेशांत

जाणाऱ्यांनीं स्वदेशीं परत आल्यानंतर प्रायश्चित्त घेण्यांत कांहीं तरी अर्थ आहे! जणूं जोंपर्यंत परदेशीं असे तोंपर्यंत जी स्वदेशसेवा ... त्या बद्दल प्रायश्चित्त घेण्यांत इतकाच हेतु असतो कीं परदेशांत आपद्धर्म ह्मणून करावे लागणारे नकली प्रकार सुटावेत आणि पूर्वींचाच असलपणा जागृत व्हावा! असो. असे प्रकार घडून येत असल्याचें दिसून आले खरें. आणि नासिक सारख्या ठिकाणीं असणाऱ्या श्रीरामाच्या मंदिरांत मूर्ति असल्यामुळें त्या ठिकाणीं घुसण्याकरितां अस्पृश्यजातींतल्या मंडळींना प्रोत्साहन देण्यांत सुख मानणारे नवमताभिमानी तर अशा मंदिरांत जाऊन ईश्वराची प्रार्थना करीत असतांना दिसले कीं ज्या मंदिरांत मूर्ति नाहींत आणि अस्पृश्यता निवारण करण्याच्या हेतूनें मूर्ति असणाऱ्या मंदिराचें द्वार एका महंतानें उघडून दिलें असतांनाहि त्या मंदिरांत कोणीच जाईनासे झाले. तेव्हां तर असेच दिसून आले कीं श्रीराम मंदिरासमोर सत्याग्रह करण्यांत कोणीहि श्रद्धाळू अस्पृश्य नसून ते नवमताभिमानीच आहेत आणि त्यांचा तो सत्याग्रह नसून हट्टाग्रहच आहे! जणूं काय ज्यांना नवीन मताप्रमाणें इतर धर्मियाकडे आणि समाजिष्टाकडे पाहून स्पृश्यास्पृश्यतेचे विचार पाळावयाचे नाहींत त्यांनीं प्रार्थना मंदिरांत जाऊन अव्यक्त असणाऱ्या परमेश्वराची प्रार्थना करणें जसें योग्य आहे. त्याच प्रमाणें नराचे नारायण होणाऱ्या देवतांच्याद्वारे परमेश्वराचेंच व्यक्त रूपांत दर्शन होत असल्यामुळें त्या देवतांचेंहि ज्यांना पुजन

कारावयाचें आहे त्यांना त्या देवतांचे पावित्र्य राखिले जावे ह्मणून त्यांची पुजा करीत असतांना स्पृश्यास्पृश्यतेच हि विचार सुद्धां पाळणें योग्यच आहे! ह्मणूनच कीं काय नासिक येथें सुद्धां अस्पृश्य जातींतील श्रद्धाळू मंडळी मंदिरांत न जाता बाहेरूनच देवाला नमन करीत असतांना दिसली, ती इतक्याच हेतूनें कीं भ्रष्टाकार कालविण्याचा अविचार केल्यामुळें पुढें होणारा ईश्वरी कोप टळावा? कारण अव्यक्त असणारा परमेश्वर एकच असून जरी कृपाळू असला तरी निरनिराळ्या देवतांच्या द्वारेंहि त्याचेंच व्यक्त रुपांत दर्शन जनतेला होऊन त्या देवतांकडूनच अविचारी लोकांना शिक्षा करवून विचारी लोकांचें रक्षण करण्यांत त्याचें कृपाळूपणच आहे. आणि ह्मणूनच पूर्वी रावणासारख्या आणि कौरवा सारख्या अविचारी लोकाना शिक्षा होऊन विचारी लोकांचे जसें रक्षण झालेलें आहे त्याच प्रमाणें हल्लींच्या काळांतहि होणारेंच आहे हेच सनातन असलेलें तत्वच शेवटीं पटण्या सारखे आहे. कारण तसें नसतें तर रामकृष्णादिकांची पुजा आज सुद्धां होत असतांना दिसली असती कशी? खरच, तसे आहे ह्मणूनच आज देवतांची पुजा अशा पावित्र्यांत होत असतांना दिसून येत असून नवमताभिमान्यांचे लक्ष सुद्धां श्री शिवाजी महाराजा सारख्या श्रेष्ठ पुरुषांचें पुतळें उभारण्या पर्यंत पोहचलेलें आहे. इतकेच नव्हे तर श्री शिवाजी महाराजांचें उत्सव करीत असतांना त्यांचे लक्ष जेव्हां श्रीसमर्थांकडे जाते तेव्हां श्रीसमर्थांच्या

छाया चित्राला [फोटोला] ते हार घालतांना पावित्र्य राखण्याच्या हेतूनें आचार विचार पाळतांनाच दिसता. तहि. असो. अशा प्रकारें आणि त्यांतल्यात्यांत सुखांतीं दुःख भोगावें लागल्यां नंतर तर कितीतरी निरनिराळ्या प्रकारचे निरनिराळीं सनातन तत्वेंच शेवटीं पटत असतांना दिसलीं. कारण दुरून साजरा दिसणाऱ्या डोंगरा प्रमाणें साजरा दिसणाऱ्या परधर्मांत धर्मांतर करून जाण्यांत सुख मानणारे कितीतरी नवमताभिमानी पुढें तेथील कांटे बोंचू लागून दुःख होऊं लागल्या बरोबर शुद्धीवर आले तेव्हां आपण होऊनच प्रायश्चित्त घेऊन पुनः स्वधर्मांत येत असतांना ते पुराणमताभिमानीच होत असतांना दिसले! तसेंच स्वाः मालिनी विवाह झाला. तेव्हां नवीन मताप्रमाणें सुधारणेचें पाऊल पुढें पडलें असें म्हणण्यांत सुख मानणाऱ्या कितीतरी नवमताभिमान्यांना पुढें मालिनीबाईची झालेली स्थिति पाहून दुःख होत असतांना दिसलें! त्याच प्रमाणें धर्मांतर करून परधर्मांत गेलेल्या मंडळींना प्रायश्चित्त देऊन पुनः स्वधर्मांत घेत असतांना ज्यांचा पुत्रींचा मुलींचा संबंध नाहीं अशाहि परधार्मियांना स्वधर्मांत आणून आणि त्यांतल्या त्यांत एका स्त्रिला स्वधर्मांत आणून तिला गृहलक्ष्मी करणाऱ्याला प्रोत्साहन देऊन त्या संबधानें नासिक सारख्या ठिकाणीं सनातनियांशीं खडाजंगी वाद करीत असतांना शास्त्रार्थाची ओढाताण करण्यांत सुखमानणाऱ्या कितीतरी नवमताभिमान्यांना पुढें त्या

स्त्रिच्या पायी लाखों रुपये परदेशांत गेलेले पाहून दुःख होत असतांना दिसलें! तसेंच जातीभेद नाहींसा करण्याचा हेतूनें नैसर्गिक असलेल्या धर्मातील जाति मोडण्यांत सुख मानणाऱ्या नवमताभिमान्यांना त्या जाति न मोडतां त्या योगें उलट नवीन जाति आणि समाज वाढतांना पाहून कितीतरी दुःख होत असतांना दिसलें! तेव्हां तर भाऊ बंदकी नाहिशी करण्याकरितां भावांना नाहींसें करण्याची जशी जरुरी नाहीं त्याच प्रमाणें जातीभेद नाहींसा करण्याकरितां जाति मोडण्याचीहि जरुरी नाहीं. असेंच शेवटीं प्रत्येकाला वाटत असल्याचें दिसून आलें. आणि जात या शब्दापासून जन्मलेला असाच बोध होत असल्यामुळें जाति बदलविणें मनुष्यांच्या स्वाधीन नसून ज्याच्या शक्तींत जन्म देणें असेल त्याच्याच स्वाधीन जातीत वालणें आहे, हेंच पटत असतांना दिसलें! जणूं काय, कर्मा प्रमाणें जरी जात पुढें कोणी बदलविली तरी तिला जात तर ह्मणतां येणारच नाहीं आणि यदाकदाचित् कोणी ह्मटलेंच तर एकाच मनुष्याला आपल्या आयुष्यांत कितीतरी जातीचे ह्मणवून घ्यावे लागेल! आणि जन्म सिद्ध हक्काप्रमाणेंच जात सांगावयाची झाल्यास एकच जन्मकाळीं असणारी जात सांगून इतर कर्मा प्रमाणेंच पुढें बदलत जाणाऱ्या जाति सांगण्याचा त्याला जन्मसिद्ध हक्क आहे असें कसें ह्मणतां येणार? ह्मणूनच कीं काय ज्या अर्थी जगांत जे जे कांहीं दृष्टोत्पत्तीस पडत आहे त्या सर्व ठिकाणीं जाति आणि पोटजाति

दिसून येत असल्यानें निरनिराळ्या प्रकारें त्यांचा उपयोग होत आहे, त्या अर्थी मनुष्यांत सुद्धां असणाऱ्या जातींत आणि पोटजातींत कांहीं तरी अर्थच असून त्या सर्व जाति आणि पोटजाति महत्वाच्या आहेत, हेंच शेवटीं प्रत्येकाला पटत असल्यामुळें जनताजनार्दनांतील सर्व मंडळी एकमेकांवर प्रेमच करीत असतांना दिसली. जणूं काय, जाति आणि पोटजाति नेहमीं राहणाऱ्याच असून त्या नैसर्गिक असणाऱ्या धर्मांत तरी नाहिशा होणें केव्हांहि शक्यच नाहीं! कारण उदाहरणाकरितां ह्मणून जर तांदूळासारख्या धान्यांत असणाऱ्या जातींचा आणि पोटजातींचा विचार केला तर असेंच दिसून येतें कीं हे सर्व प्रकारचें तांदूळ एकत्र करून बाहेर ठिकाणीं तें भेसळ तांदूळ जरी उपयोगांत आलें तरी मूळ ठिकाणीं निरनिराळ्या जातींचें आणि पोटजातींचे तांदूळ पिकणें नैसर्गिक असल्यामुळें जे पिकावयाचे ते पिकणारच. त्याच प्रमाणें नैसर्गिक असणाऱ्या धर्मांतील तत्वांच्या विरुद्ध आपलीं नवीन मतें प्रतिपादन करून कोणी नवीन समाज अथवा धर्म स्थापन केले आणि त्या कृत्रिम समाजांची आणि धर्मांची वाढ होत जाणी ह्मणून नैसर्गिक असणाऱ्या सर्व जातींची भेसळ केली, तरी ती भेसळ त्या नवीन समाजापुरतीच राहून हिंदुस्थान सारख्या आर्यांच्या मूळ भूमींत नैसर्गिक असणाऱ्या सनातन धर्मांत जाति आणि पोटजाति सहवयाच्या त्या राहणारच. ह्मणूनच कीं काय, पांच कोटी अस्पृश्यांचा प्रश्न पुढें करून

८३८५

नवमताभिमान्यांनीं पुराणमताभिमान्यांवर मन मानेल तसा कितीहि अपशद्बांचा भडिमार केला आणि कांहीं अस्पृशांनींहिं रागाच्या भरांत आणि चिथावणी मुळें परधर्म स्विकारला तरी ज्या मुर्तिपुजेकरितां त्यांनीं स्वधर्म सोडला तशा प्रकारची मुर्तिपुजा त्यांना परधर्मांत गेल्या नंतर करतां आली नाहीं; इतकेच नव्हे, तर त्यांच्या प्रार्थना मंदिरांत मूर्ति नसलेल्या पाहून त्यांना अंती दुःखच होत असतांना दिसलें. आणि इतर धर्मियांनीं मूर्ति असणाऱ्या मंदिरांत जरी प्रवेश केला तरी तो प्रवेश पुजे करितां धार्मिक स्वरूपाचा नसल्यामुळें निरुपयोगीं कसा असतो, हेंहि त्यांच्या शेवटीं लक्षांत येत असल्याचेंच दिसून आलें. आणि रोटी बेटी व्यवहार करण्यांत संघटनाच होईल अशी भ्रामक कल्पना करण्यांत सुख मानणाऱ्या नवमताभिमान्यांना ब्राह्मणा–ब्राह्मणांतहि भांडणें होत असतांना पाहून अंतीं दुःखच होत असल्याचें दिसून आलें. तेव्हांतर भांडणं करणें हें रिकामपणाचेंच काम असल्याचें दिसून आलें, आणि अंधश्रद्धा, अंधरूढि, पक्षांध वगैरे प्रकारचे आरोप पुराणमताभिमान्यांवर करून आपणासच सत्यान्वेषणी म्हणून घेण्यांत सुख मानणाऱ्या कितीतरी नवमताभिमान्यांनाहि अंधानुकरण केल्यामुळें अंती दुःखच होत असतांना दिसलें. जणूं काय, सत्यान्वेषण करित असतांना रागावणें हें पक्षांधतेचेंच लक्षण असेंत! कारण जें सत्य आहे तें सांगण्या करितां कोणत्याहि प्रकारचे तमोगुणी प्रयोग करण्याची जरूरी

नसून असत्याला जबरदस्तीनें अपशब्दांच्या भडिमाराखालीं सत्य ठरविण्याचा प्रयत्न करण्यासारखें असल्यामुळें अंतीं त्यायोगें यश न येतां दुःखच होणारें असतें. असो. अशा प्रकारें निरनिराळ्या बाबतींत सुखांतीं दुःख भोगावें लागल्यानंतरच नव्हे तर इतरांनाहि दुःख भोगतांना पाहून कितीतरी मंडळी शुद्धीवर येत असतांना दिसली. ह्मणूनच असें केल्यानें काय होतें, असे ह्मणतां ह्मणतां जसजशी मनाची चंचलता थोडथोडी वाढत जाते तसतसा तमोगुणहि त्यामानानें वाढत जाऊन पुढें रागाच्या भरांत अत्याचार करण्याकरितां प्रवृत्त होण्यापर्यंत पाळी येते, इतकेंच नव्हे तर आत्महत्येसारखे नरकवासास पोहचविणार असें अविचारहि घडून येण्यापर्यंत तमोगुणाची मजल पोहचते. तव्हां मनाला चंचल करून त्यामुळें तमोगुणाची वाढ करण्यास कारण असणारें वर्तन नकलीपणामुळें असतें ह्मणून लहान लहान वाटत असणाऱ्या नवीन मतांना सुद्धां भुलून न जातां जे जसजसे शुद्धीवर येत गेले त्याच मानानें ते स्वधर्मानुरूप आचरण करून असे कांहीं स्वाभिमानी होत असतांना दिसले कीं ते पुराणमताभिमानीच आहेत! तेव्हांतर कित्येक मंडळी चहापिण्यासारखें व्यसन सुद्धां सोडून देत असतांना दिसली. जणूं काय, चहा पिण्यानें थोडावेळ उसनी हुशारी वाटत असली तरी त्यामुळें मनाला चंचलताच येते! आणि कांहीं मंडळी तर इतर श्रेष्ठ पुरुषांच्या पुण्यतिथि पाळतां पाळतां आपल्या आईबापाच्याहि पुण्यतिथि, श्राद्ध पक्ष सुद्धां करून पाळूं लागली तेव्हांच

त्या मंडळींचें लक्ष जन्मभूमीकडे जाऊन " जननी जन्म भूमिश्च स्वर्गादपि गरीयसी " हेच तत्व शेवटीं त्यांना पटत असतांना दिसलें. जणूं काय आईबापाचें स्मरण होऊं लागलें ह्मणजेच जन्मभूमीकडे लक्ष लागणें ओघा-नेंच असतें ! असो. जनतेंत जसजशी जागृति होत गेली त्याच मानानें जनताजनार्दनांत निरनिराळया प्रकारें वाढच होत असतांनाहि दिसलो खरी. आणि त्या जनताजनार्द-नांत निरनिराळया धर्मांची आणि समाजांची मंडळी दिसून ते सर्वजण आपआपल्या जन्मसिद्ध हक्कांचें रक्षण करण्याकरितां आपले स्वधर्मानुरुप असणारे आचार विचार आणि परम्परा पाळतांना स्वदेशी वस्तूनां उत्तेजन मिळावें ह्मणून स्वदेशी–व्रत पाळण्याचेंहि मनोधैर्यच दाख वून नैसर्गिक दृष्ट्या पोषक असेल असेच खाण्यापिण्याचे हि व्यवहार ठेवतांना दिसले आणि त्या योगेहि त्यांच्यांत शक्तीचीहि वाढच होत असतांना दिसली. आणि त्यांच्या कडून प्रत्येक बाबतींत होत जाणारी सुधार-णाहि. अशी कांहीं रूढि ह्मणून पडतांना दिसली कीं " शास्त्रांत रूढिर्बलीयसी " हेंच सनातन तत्व शेवटीं प्रचितीस येत असतांना दिसलें. तेव्हांच ती भाग्यवान मंडळी स्वाभिमानी आणि कर्तव्यतत्पर राहून प्रत्येक प्रसंगीं अंतीं धर्म कर्म संयोगानें प्राप्त होणारें फलहि आनंदांतच भोगतांना दिसून आपआपल्या घरांत असें कांहीं स्वराज्य स्थापन करीत असतांना दिसली कीं त्या मंडळींत जर कोणी तमोगुणाच्या सपाट्यांत सांपडून निरनिराळ्या प्रकारचे मायावी खेळ खेळतां खेळतां थोडे

मनाजोगे झालें नाहीं ह्मणजे रागावतांनाच दिसले .तर त्या वेळेपुरते त्यांनीं जास्त चेंकाळू नये ह्मणून त्यांच्या बरोबर भांडणच नव्हे तर वादविवाद सुद्धां करीत न बसतां इतर मंडळीहि अशी कांहीं युक्तीनें वागत असतांना दिसली कीं त्या तामसी मंडळींनीं पुढें अ पण होऊनच शुद्धीवर यावे ! आणि त्या प्रमाणें ती तामसी मंडळी सुद्धां दुःख होऊं लागल्या नंतर आणि इतर तामसी मंडळींनां दुःख होत असतांनाच नव्हे तर एखाद्या तामसी गृहमालका बरोबर घरातील इतर मंडळी परोपरीं खोटें बोलून वेळ कशी मारून नेतात आणि एका घरांतच सगळी मंडळी तमोगुणी असली तर ती मंडळी एक मेकावर कुत्र्यासारखी कशी ओरडतात हें पाहून शुद्धी वर येत असतांना दिसली. असो. सुखानें वावरणाऱ्या जनताजनार्दनांत असणारी सर्व प्रकारची भाग्यवान मंडळी आपआपली कर्तव्यं करून स्वातंत्र्यांत करीत राहून सार्व- जनिक बाबतींत तर अशीं कांहीं जूट करून राहत असतांना दिसली कीं कोणाच्याहि घरांत थोडेसें खट वाजलें तरी घरांत शिरणाऱ्या आयतोबा सारख्या चोरांना अडविण्याकरितां सर्वजण एकदम धावूनच येत असतांनाहि दिसली. जणूं काय अशाप्रकारें घरांचे रक्षण करणें ह्मणजे घरापासून सुरू होत असणाऱ्या स्वराज्याची वाढ करणें असून ती वाढ जसजशी राष्ट्रांत पसरत जाईल त्याच मानानें त्या राष्ट्रांत स्वराज्याचीहि वाढच होणार आहे ! मग जनताजनार्दनांस वाढ व्हावी ह्मणून जन- तेला जागृत करणाऱ्या महात्म्यांचा आदर सत्कारहि

त्यांच्या योग्यतेनुरूप जनताजनार्दनापैकीं प्रत्येकजण करीत असतांना दिसला तर त्यांत नवल काय? आणि खरें स्वार्थत्याग करणारें असे महात्मे कोण आहेत आणि स्वार्थत्यागाच्या नांवाखालीं आपला डाव साधून घेणारे भोंदू कोण आहेत हेंहि जनताजनार्दनापैकीं कोणालाहि ओळखून काढतां येणें कसें कठीण असणार? कारण खरा स्वार्थत्याग करणारे महात्मे कष्टाचें दुःख सोसण्या करितां नेहमीं तयार असलेले दिसून टांकीचे घाव खाणाऱ्या दगडा प्रमाणें त्यांनाहि देवपण येत असतांना दिसून, कष्टाचें दुःख सोसतांना जे कचरले आणि ओरडूं लागले त्यांचेंहि भोंदूत्वच शेवटीं प्रगट होत असतांना दिसलें. जणूं काय; कष्टाचें दुःख सोसतांना ओरडणें आणि सुखाची अपेक्षा करणें, हे दानवी प्रकार असून जितकें जास्त कष्टाचें दुःख सोसण्याची तयारी असेल तितकें जास्त देवपण येतें हें सनातन तत्वच खरें आहे! असो. स्वार्थ त्याग करणारी आणि निस्वार्थी मंडळी अशी कांहीं सहनशीलता ठेवून शांतता राखतांना दिसली कीं त्या मंडळीवर कितीहि कष्टाचें दुःख सोसण्याचा प्रसंग आ[illegible] तरी त्या मंडळीकडून हूं कीं चूं नाहीं. जणूं काय, हल्लींच्या काळांत सहन-शीलतेमुळेच अंतीं यश प्राप्त होऊन जस जशी जनता जागृत होत जाईल त्याच मानानें जनताजनार्दनांतहि वाढच होणारी आहे! आणि पूर्वी देवदानवांत जसें युद्ध झालें तसें हल्लींच्या काळांत कल्की अवतारांतील ध्येय नसून जनतेचा भव संदेह फिटावा हेंच ईश्वराचें ध्येय

असल्यामुळें हल्लीच्या शांततामय अनत्याचारी चळवळींत दाखविलेल्या लोकांच्या सहनशीलतेंतच ईश्वराचें अधिष्ठान असल्याचें दिसून आलें. कारण गतवर्षीं त्या चळवळीला कितीतरी जोर येतांनां दिसून प्रत्येक प्रसंगीं जनतेचा भवसंदेह जसजसा फिटत गेला त्याच मानानें स्वदेशी वस्तू वापरण्याचा स्वाभिमान सुद्धां जनतेंत जागृत होऊन त्या योगें जनताजनार्दनांत वाढच होत असतांना दिसली! फार काय तर वर्षारंभीं पहिल्याच




## विश्वमान्य गांधीजी

आठवड्यांत विश्वमान्य गांधीजींनीं जेव्हां या चळवळीचें ध्येय पुकारलें तेव्हां निरनिराळ्या प्रकारें जनतेचा भवसंदेह फिटत गेला म्हणूनच कीं काय, कितीतरी तमोगुणी नवमताभिमानी मंडळी सुद्धां शुद्धीवर येऊन त्या योगें जनताजनार्दनांत वाढच होत असतानांहि दिसली आणि स्वदेशी वस्तूंचाहि खपहि जोरानेंच होत असतांना दिसला. आणि त्या चळवळींत प्रत्यक्ष भाग घेणारी निस्वार्थी मंडळी तर अशी कांहीं सहनशीलतेची कमाल करून शांतता राखतांना दिसली कीं त्या मंडळींत ईश्वराच्या सात्विक गुणाचीच वाढ होत आहे! तेव्हां तर असेंच दिसून आलें कीं प्रत्येक प्राणिमात्राच्या

ठिकाणीं ईश्वराचाच फक्त अंश नसून तमोगुणी शेषाचा आणि रजोगुणी लक्ष्मीचाहि प्रभाव पडलेला असल्यामुळें सत्व, रज आणि तम् हे तिन्ही गुण जन्मापासून उपजतच असल्यामुळें जरी सतत राहणारे असले तरी त्यांतल्यात्यांत जे सात्विक गुणाची वाढ करतात त्यांच्यांत ईश्वराचा अंश वाढीस लागून ते नराचे नारायण होत जातात. त्याच प्रमाणें जे तमोगुणाची वाढ करतात ते मायावी खेळ खेळणारे आपमतलबी भोंदू सुखांती दुःख भोगतांना दिसून रजोगुणाची वाढ करणारी मंडळी जनताजनार्दनांत असतात. म्हणूनच की काय सहनशीलतेची कमाल करून दाखविणाऱ्या महात्म्यांचा आदर सत्कार करून कोणत्याहि प्रकारचा अत्याचार करण्याचाच अविचार करणाऱ्या तामसी मंडळीपासून जनताजनार्दनांपैकीं प्रत्येक जण सावध राहत असतांना दिसली. तेव्हांतर कुत्र्यासारखी अंगावर धांवून येणारी तामसी मंडळी कुतरसेनाच वाटत असतांना दिसून त्या कुतर सेनेला झुलविणारी मंडळीहि अशी कांहीं दिसली कीं ती वानरसेना आणि मांजरसेनाच आहे ! असो. शांततामय अनत्याचारीचळवळीमुळें जसजशी जनता जागृत होत जाईल त्याच मानानें जनतेचा भवसंदेह फिटत जाऊन त्या योगें जगांत सुखानें वावरणाऱ्या जनताजनार्दनांत वाढ होत जागारी आहे खरी. आणि म्हणूनच पूर्वी कधींहि न भरलेली अशी महत्वाची परिषद सुद्धां राजधानीच्या शहरीं भरविली जाऊन त्या ठिकाणीं जे निरनिराळ्या प्रकारचे विचार झाले त्याचा निकाल

हिंदुस्थानांत परिषद भरली ह्मणजे लागून जनतेला सुख प्राप्त व्हावें या हेतूनेंच सगळ्या प्रकारचेच प्रश्न सुटणारे आहेत, असेंच विवेकांना वाटत असल्याचेंहि दिसून आलें. कारण विश्वमान्य गांधीजी सारख्या महात्म्यांना कांहीं मंडळी कोलहि लावीत असतांना दिसून तुरुगांत असणारी बरीचशी पुढारी मंडळी सुटूनहि येत असतांना दिसली. असो. ज्यांनीं सहन-शीलतेची कमाल करून दाखविली त्यांच्यांत स्त्रियांनीं जास्त भाग घेतलेला असल्याचें जरी दिसून येत अस-ले तरी पुरुषार्थ दाखविण्याची ही वेळ नसल्यामुळें दडून बसल्यासारखे दिसत असणाऱ्या पुरुषांपैकीं ज्यांनीं हल्लीच्या चळवळींत भाग घेतला तेहि धन्य आहेत यांत संशय नाहीं. जणूं काय, " मारतां मारतां मरावें " असा पुरुषार्थ दाखविणाऱ्या वीराबरोबर पूर्वीं जशा झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाई पुरुषार्थ दाखवून धन्य झाल्या त्याच प्रमाणें " मरे पर्यंत शांतता राखावी " असा सहनशीलतेचा स्वाभाविक गुण असणाऱ्या स्त्रियां बरोबर ज्या पुरुषांना कोणत्याहि प्रकारच्या अत्याचाराला प्रवृत्त न होतां सहनशीलतेची कमाल करून दाखविली तेहि पुरुष आतां धन्य असून महात्मेच आहेत ! ह्मणूनच कीं काय जनतेचें सर्व लक्ष ज्या योगें भवसंदेह फिटतो अशा शांततामय अनत्याचारी चळवळी सारख्या जनतेला जागृत करणाऱ्या चळवळीकडे लागून जनता-जनार्दनांतच वाढ करण्याकडे लागलेलें दिसलें. मग तमोगुणी शेषाच्या झांपडींत सांपडून प्रत्येक प्रसंगीं जर

कोणाला निरनिराळ्या प्रकारे सुखांतीं दुःख भोगावें लागलें तर त्याला इतरांनीं काय करावें आणि ईश्वरानें तरी काय करावें? जणूं काय " हांसत कर्म करावें भोगावें रडत तेचीं परीणामीं " या सनातन तत्वा प्रमाणें सुखांती दुःख भोगल्या शिवाय गत्यंतर नसून सुख प्राप्त करून घ्यावयाचें असल्यास अगोदर दुःखरूप मूल्य द्यावेंच लागतें, तेव्हांच दुःखांतीं सुख कसें प्राप्त होतें हें समजतें. आणि " आधीं कष्टाचें दुःख सोसिति ते पुढें सुखाचें फल भोगिती ॥ जिहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ॥ " हें श्री समर्थांचें ह्मणणेंहि अनुभवास येतें. असो. सुख दुःख भोगणें फक्त मानण्यावरच नसून कर्मानुसार भोगावें लागतें खरें. आणि तें बहुमतावरहि अवलंबून नसतें. जणूं काय शंभरांत नव्याण्णव जरी दारू पिणारे असले तरी बहुमतामुळें दारू पिण्यांत सुख नसून अंतीं त्या पासून दुःखच होणारें असत! आणि दारू न पिणारा एक जरी असला तरी तोच सुखांत असतो. मग नव्याण्णव दारू पिणारे त्याची कितीहि थट्टा करोत? अशा प्रकारें कसाहि विचार केला तरी असेंच दिसून येतें कीं सुख प्राप्त करून घेणें आणि दुःख भोगणें हें कोणत्या कर्म करण्यावर अवलंबून असल्यामुळें प्रत्येक मनुष्याच्या स्वाधीन आहे आणि ह्मणूनच घरांतल्या घरांत सुद्धां बापलेकांत आणि भावाभावांतहि ज्यांचें जसजसें प्रत्येक भीतिदायक प्रसंगीं भयभय नाहीसें होत जाईल त्याच मानानें त्यांच्या भयसंदेह फिटत

जाऊन ते जागृत होऊं लागले ह्मणजे धर्म कर्म संयो-
गानें त्यांच्यांत सुखाचीहि वाढ होत जाऊन त्या योगें
जनताजनार्दनांत जरी वाढ होत जाणारी असली तरी
जागृत होत तों पर्यंत मात्र प्रत्येकाला दुःखहि भोगा.
वेंच लागणारें आहे यांत संशय नाहीं. असो.
हिंदुस्थानचें भवितव्य उज्ज्वल आहे ह्मणूनच गतवर्षी
तर निरनिराळ्या प्रकारें जनतेचा भवसंदेह फिटत जाऊन
जनतेपैकीं बरीचशी तमोगुणी मंडळी सुद्धां जागृत होत
गेल्यामुळें जनताजनार्दनांत सपाट्यानें वाढच होत अस-
तांना दिसली आणि धरणीकंपांत जशी स्थिति होते
अथवा विजेचा जबरदस्त धक्का लागावा त्या प्रमाणें
तारीख ६।२।३१ रोजीं तर कै. पंडित मोतीलालजी
नेहरू यांच्या निधनवार्तेनें प्रत्येकाच्या अंतःकरणाला असा
कांहीं धक्का बसला कीं नवीन मतांचा पुरस्कार करून
मनोराज्यांत गुंग असणारी मंडळी सुद्धां जागृत झाली
तेव्हां पंडितजींच्या चरित्राकडे पाहून त्या मंडळींनाच
काय, तर जनते पैकीं प्रत्येकाला अखेंच शेवटीं वाटत
असतांना दिसलें कीं नवीन मतें भुरळ घालणारीं
असून अशा नवीन मतांचा कोणी कितीहि पुरस्कार
केला तरी ते जागृत झाले ह्मणजे स्वाभिमानीच होणार
आहेत! मग भीति कसली? आणि ह्या मंडळींना
भीति वाटत असेल ती मंडळी मनांत मनोराज्य करून
मनाजोगें झालें नाहीं ह्मणजे आपलेच हातपाय आपटून
घेणाऱ्या तमोगुणी मंडळी शिवाय दुसरी तरी कोण
असणार? जागृत असणारी जनताच जनताजनार्दन

८३८४

असल्यामुळें त्या जनतेपैकीं कोणालाहि कोणत्याहि प्रसंगीं भीति वाटत असतांना दिसली नाहीं आणि दिसतहि नाहीं ह्मणून पुढेंहि ती वाटत असतांना दिसणार नाहीं हें खास. मग एकाच प्रसंगाचें निरनिराळ्या प्रकारें वर्णन करण्यांत तरबेज असणारी कांहीं मायाळी मंडळी आपल्याच मतांचा पुरस्कार करण्याच्या हेतूनें वाटेल तशी बातमी वर्तमानपत्रद्वारें सुद्धा प्रसिद्ध करून कितीहि दिशाभूल करण्याचा प्रयत्न करोत आणि कशाहि प्रकारची भीति दाखवोत? इतकें सांगून ज्या नर्मदामाईच्या कृपेनें विचारास वळण लागून लेख लिहिण्याची स्फूर्ति झाली त्या जागृत देवतेला नमन करून " हर नर्मदे हर हर महादेव " या जय घोषांत श्री सच्चिदानंद महाराज ( वडगांवकर ) यांच्या प्रेरणाज्ञेनें हा सोळावा लेख श्री शिवार्पण करण्याची परवानगी घेतो.

गतवर्षी " जनताजनार्दन " या विषयावरील लेख जनतेपुढें सादर केल्यानंतर पुढें संबंध वर्षांत जनता जसजशी जागृत होत गेली त्याच मानानें जगांत सुखानें वावरणाऱ्या जनताजनार्दनांत वाढ होत जात असतांना दिसून ज्या योगें जनतेच्या निरनिराळ्या प्रकारें भवसंदेह फिटतो अशा जनतेला जागृत करणाऱ्या शांततामय अनत्याचारी चळवळीकडे जनतेचें लक्ष लागलेलें दिसलें, तसेंच नवें वर्ष बंधुभगिनींना मुलांबाळांना आणि सर्वत्र मंडळींना सुखाचें जावो, ह्मणून प्रत्येकाचें लक्ष त्या सुरू झालेल्या

चळवळीकडे असें कांहीं लागो कीं कोणाचेंहि लक्ष ज्या योगें तमोगुणाची थोडीशीहि वाढ होते अशा कोणत्याच प्रकारचा अत्याचार करण्यासारखा अविचार करण्याकडे न जातां प्रत्येक भीतीदायक प्रसंगीं सुद्धां त्यांचा भय-संदेहच फिटन जाऊन ते असें कांहीं जागृत होवोत कीं त्यांना जन्मा पासून असणाऱ्या सर्व प्रकारच्या जन्म-सिद्ध हक्कांची जाणीव होऊन त्यांच्या कडून स्वदेशी धंद्यांनाहि उत्तेजनच मिळो ! आणि अशा प्रकारची जागृति व्हावी ह्मणून चांगली संगत पाहिजे आणि ती संगत जन्मापासून लाभली तर फारच चांगलें असल्यामुळें प्रत्येकेजण परमेश्वरापाशीं श्री तुकाराम महाराजांनीं उप-देशिल्याप्रमाणेंच असेंच दान मागोत कीं " हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा ॥ गुण गाईन आवडी, हेंचि माझी सर्व जोडी ॥ नलगे मुक्ति धन संपदा, संत संग देई सदा ॥ तुका ह्मणे गर्भवासीं, सुखें घालावें आह्मांसी ॥" आणि तशा प्रकारचें दान देण्यांत परमेश्वराच्या न्यायीपणालाहि बाध येत नसल्यामुळें तोहि तें दान मागणाऱ्यांना देण्याची कृपा करो, आणि तमोगुणी शेषाच्या लपाट्यांत सांपडून थोडेसें मनाजोगें झालें नाहीं ह्मणजे उठतां बसतां रागावणारी तामसी मंडळीहि सुखांतीं दुःख भोगावें लागल्यानंतर तरी होतां होईल तितक्या लोकर शुद्धीवर येऊन अशीं कांहीं जागृत होवोत कीं त्या योगें जनताजनार्दनांतच वाढ होवो, असें जनतेपैकीं प्रत्येकांच शुभ चिंतून मीहि जनतेप्रमाणेंच इष्ट देवतेचें स्मरण करून परमेश्वरापाशीं दान मागणारा आणि पादस्पर्शी

भेट ह्मणून मामुली प्रमाणें वसरारंभी ध्वजारोपण प्रसंगीं विश्वमंदिरांत सूर्यरूपीं तेजानें प्रकाशणाऱ्या सूर्यनारायणाला नमन करून आणि अवतार भूपाळी ह्मणून हा लेख जनतेपुढें नम्रपणें सादर करणारा,

जनतेचा कृपाभिलाषी,

**गोविंद रंगराव अळेकर.**

( नवी शुक्रवारी नागपूर शहर )

हल्ली मुक्काम कारंजा, जिल्हा अकोला, वऱ्हाड.

चैत्र शुद्ध १ शके १८५२ संवत १९८७.

रोज शुक्रवार, तारीख २० मार्च १९३१.

REFBK-0004345

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ४३४५



पाडव्याची भेट म्हणून आणि इतर वेळीं पूर्वी आज पर्यंत प्रसिद्ध झालेले १५ लेखः—

१ नवरा व नवरी. तारीख २६।६ १९१८
२ पूर्णा. ता. ९।१०।१९१८
३ अवतार मिमांसा ता. २५।१०।१९१८
४ सुख व शांति. ता. १।४।१९१९
५ कर्मांची फल. ता. २।१२।१९२०
६ सत्पत्नी शिक्षा. ता. ५।३।१९२१. किं. २ आ.
७ मनःस्थिति. ता. २।३।१९२२. कीं ८ आ.
८ ज्ञान आणि ज्ञानाची वाढ ता. १८।३।१९२३ किं. ४ आ.
९ गृह आणि गृहस्थ ता. ५।४।१९२४ कीं. ८ आ.
१० गृहस्थाश्रम ता. २५।३।१९२५ किं. ४ आ.
११ ब्रह्मचर्याश्रम. ता. १५।३।१९२६ किं. ५ आ.
१२ वानप्रस्थाश्रम. ता. ३।४।१९२७. किं. ३ आ.
१३ पाडव्याची भेट म्हणून प्रसिद्ध केलेले पत्रक ता. २२।३।१९२८
१४ ईश्वर प्रार्थना. ता. १०।४।१९२९ किं. एक आ.
१५ जगातील नाटक ता. ३१।३।१९३० किं. एक आ.